स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०-२५६२२६८८/८९
: ०२०-२५६२२६९०/९१
: ०२०-२५६२२६९२
: ०२०-२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२४–२५/१५० | दि. ३१/०७/२०२४

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : "दि. ३ ऑगस्ट २०२४ रोजी, अवयव दान दिवस" साजरा करण्याबाबत

महोदय,

अवयव दान हे एक महान कार्य असून एका मृत व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला जीवन देण्याइतके दुसरे कोणतेही महत्त्वपूर्ण योगदान असू शकत नाही. सध्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मानवी अवयव प्रत्यारोपणाद्वारे विविध गंभीर आजारांवर उपचार साध्य होत आहेत. अवयवदानांतर्गत लाईव्ह ऑर्गन डोनेशनद्वारे किडनी व लिव्हर प्रत्यारोपण करण्यात येते. तसेच कॅडव्ह/मस्तिष्क स्तंभ मृत पश्चात किडनी, लिव्हर, लंग्ज, हार्ट त्वचा इत्यादी अवयव दान करण्यात येतात.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व विभागीय प्रत्यारोपण समन्वय केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयातील रासेयो संलग्नित महाविद्यालयांमध्ये **"दि. ३ ऑगस्ट २०२४ रोजी, अवयव दान दिवस"** साजरा करावयाचा आहे. त्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयात रासेयो स्वयंसेवकांमार्फत अवयव दान संदर्भात घोषवाक्य, प्रश्नमंजुषा, निंबध स्पर्धा अशा विविध स्वरूपाच्या उपक्रमांचे आयोजन करून जनजागृती करण्यात यावी. तसेच सोबत जोडलेली अवयव दान प्रतिज्ञा महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांबरोबर घ्यावी.

सदर उपक्रम संपन्न झाल्यानंतर उपक्रमाचे फोटो व अहवाल त्वरीत nss_student_list@pun.unipune.ac.in या मेलवर **"अवयव दान दिवस"** या विषयासह पाठवण्यात यावा.

कळावे, ही विंनती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना